## नियमीत दिवाणी मुकदमा नंबर १५२/२०१२

## निशाणी १०१ वरील आदेश

१. प्रस्तुत दावा वादीनी प्रतिवादीविरुध्द दावा परि. ब व क मध्ये वर्णन केलेल्या एकत्र कुटूंबाच्या मिळकतीचे वाटप होवुन मिळणेसाठी दाखल केला आहे. प्रस्तुत दाव्याचे कामी निशाणी ५ कडील अर्जान्वये दावा मिळकतीत कोणताही बदल करु नये म्हणुन ताकीद अर्ज दाखल केला होता. प्रतिवादीनी मुळ ताकीद अर्जाचे कामी प्रतिवादीनी कुठल्याही स्वरुपाचे बांधकाम केले नव्हते. त्यामुळे नि. ५ कडील अर्जाकामी वादीनी प्रतिवादीविरुध्द मनाई मागण्याचा प्रश्न उद्भवला नव्हता. अलिकडे प्रतिवादी मधुकर शिंदे यांनी स.नं.७१८/२ब मधील भूखंड १९ मध्ये बेकायदेशीर व विनापरवाना बांधकाम सुरु केले आहे. वादी यांनी त्यांना बांधकाम थांबविणेबाबत सांगितले असता प्रतिवादी यांनी अर्वाच्च व बिमुर्तखोर भाषा वापरली त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज वादीना दाखल करणे भाग पडले आहे.

२. प्रतिवादी नं. २,७, व ८ यांनी निशाणी १०५ येथे म्हणणे सादर करुन अर्जातील कथन नाकारली आहेत. स.नं. ७१८/२ब मधील प्लॉट नं. १९ ही जागा प्रतिवादी नं. २ व ३ यांची खरेदी मालकीची आहे त्याप्रमाणे प्रतिवादी नं. २ व ३ यांनी त्यांचे दरम्यान त्याचे वाटप करुन घेतले आहे. वाटपाप्रमाणे त्यांची त्यामध्ये वहिवाट आहे. प्रतिवादी नं. २ व ३ यांचे दरम्यान एकत्र संडास बाथरुमची सोय होती परंतु अलिकडे त्यांचेमध्ये वाद उपस्थित झालेने प्रतिवादी नं. ३ यांनी प्रतिवादी नं. २ याना सदर संडास बाथरुमचे वापरास मज्जाव केल्याने प्रतिवादी नं. २ यांना वाटपात आलेल्या जागेमध्ये संडास बाथरुमचे बांधकाम करणे भाग पडले आहे. प्रतिवादी नं. ३ यांनी वादीशी संगनमत करुन निव्वळ त्रास देण्याचे हेतुने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे तो फेटाळण्यात यावा.

३. दोन्ही बाजूचे कथनावरुन व दाखल कागदोपत्री पुराव्यावरुन माझे विचारार्थ पुढे मुद्दे निघतात. सदर मुद्दे व त्यावरील निष्कर्ष पुढील प्रमाणे –

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादीस प्रथमदर्शनी केस आहे काय ? | नाही |
| २ | न्यायाचा समतोल वादीचे बाजूने आहे काय ? | नाही |
| ३ | ताकीद न दिल्यास वादीचे नुकसान होणारे आहे काय ? | नाही |

| | | |
|---|---|---|
| ४ | कोणता आदेश | अंतीम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

४ प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी नं.२ यांनी दावा परिशिष्ट क मध्ये नमूद भूखंड क्र.१९ वर कुठल्याही प्रकारचे कायमस्वरुपी किंवा तात्पुरत्या स्वरुपाचे बांधकाम करु नये या मागणीसाठी दाखल करण्यात आला आहे. प्रतिवादी नं. २,७,८ यांनी निशाणी १०५ येथे अर्जावर म्हणणे दाखल केले आहे. तसेच त्या संदर्भात ता. २८.११.२०१२ रोजी कागदपत्रे दाखल केली आहेत. प्रतिवादी नं. २,७,८ यांनी असे कथन केले आहे की सदरची मिळकत ता. ४.९.२००७ रोजी प्रतिवादी नं. २ व ३ यांनी एकत्रात खरेदी केली होती. सदर खरेदीदस्ताप्रमाणे मिळकत खरेदी केल्यानंतर त्या मिळकतीत फेरफार नोंद क्र. ५४ सोबत जोडलेल्या नकाशाप्रमाणे प्रतिवादी नं. २ व ३ यांची कबजेवहिवाट सुरु झाली. निशाणी १०५ येथे दाखल करण्यात आलेल्या म्हणण्यातील परिच्छेद क्र. ४ मध्ये नमूद केल्यानुसार प्रतिवादी नं. २ हे संडास बाथरुमचे बांधकाम करीत आहेत, अशा स्थितीत ताकीद आदेश देण्यात यावा असे कथन वादी यांचे आहे.

५. दाव्याचे कामी ता. १७ व ३.८.२०१६ रोजी वादीने स्वतःचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र सादर केले आहे. तारीख २८.११.२०१२ रोजी कागद यादीसोबत तारीख ४.९.२००७ चे नोंदणीकृत खरेदीखत अस्सल स्वरुपात दाखल करण्यात आले आहे. सदरचे खरेदीखत हे निवासी घर इमारत आणि खुली जागा याचे आहे. खरेदीखताने १५०.५४ चौरस मीटर घर मिळकत व ६५.०२ चौरस मीटर खुली जागा देण्यात आली आहे. वादीतर्फे युक्तीवाद करताना सदरची जागा ही व्यापारी स्वरुपाची असून त्यामध्ये दुकान गाळे असल्याने संडास व बाथरुमचे बांधकाम करण्याची कोणतीही आवश्यकता नाही असे प्रतिपादन करण्यात आले. प्रस्तुतचा ताकीद अर्ज सर्व प्रतिवादीविरुध्द ताकीद आदेश मागणीसाठी करण्यात आला असल्याने उर्वरित प्रतिवादी नं. ३ यांना देखील ताकीद अर्जात नमूद केल्याप्रमाणे बांधकाम करण्याची कोणतीही आवश्यकता नाही असे प्रतिपादन करण्यात आले.

६. ताकीद अर्जात मागणी करण्यात आलेली विनंती आणि तारीख २८.११.२०१२ रोजीचे कागद यादीसोबत दाखल करण्यात आलेले अस्सल खरेदी खत याचा एकत्रीत विचार केला तर मुळ दावा वाटपासाठी असून दरम्यानचे कालावधीत प्रतिवादी यांनी दावा

मिळकतीच्या अस्तित्वात कोणत्याही प्रकारे बदल करु नये अशी मागणी केली आहे . दाव्या कामी वादीचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र सादर आहे. भुखंड क्र. १९ मध्ये प्रतिवादी जे काही बांधकाम करणार आहेत त्या बांधकामामुळे वाद मिळकतीचे नुकसान होणारे आहे आणि वाद मिळकतीचे मुल्य कमी होणारे आहे असे दोन्ही बाजूनी केलेला युक्तीवाद व ताकीद अर्ज याचा विचार करता दिसून येत नाही. तसेच तारीख २८.११.२०१२ च्या कागद यादीमध्ये दाखल करण्यात आलेल्या ता. ४.९.२००७ च्या अस्सल खरेदी खताचा विचार केला तर अर्जात मागणी केल्याप्रमाणे प्रतिवादी यांचेविरुध्द ताकीद आदेश मागण्यास वादी पात्र आहे असे दिसुन येत नाही. सबब मुददे क्रमांक १ ते ३ यांचे निष्कर्ष नाही असे नोंदवुन ताकीद अर्जाकामी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात येतो.

sdxx

दिनांक ७.१२.२०१६.

[ स.द.कामत.]

दिवाणी न्यायाधीश क.स्तर जत.